



# उस्ताद गुलाम रसूल संगीत महोत्सव जानेवारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : योगीराज** संगीत अकादमी व शंकरबाबा भक्त मंडळाच्या संयुक्त विद्यमाने उस्ताद डॉ. गुलाम रसूल (परभणी) शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन तापडिया नाट्य मंदिरामध्ये २६ जानेवारी रोजी करण्यात आले आहे.

यंदाचे या महोत्सवाचे ८ वे वर्ष आहे. या महोत्सवात आतापर्यंत स्थानिक कलाकारांसह आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांनी आपल्या कला सादर केल्या आहेत. यामध्ये डॉ. भारती वैशंपायन (कोल्हापूर), पद्मश्री पंडित मधूप मुदगल (दिल्ली), पंडित गणपती भट (हुबळी), पंडित भुवनेश कोमकली (देवास), विदुषी कलापिनी कोमकली (देवास), पंडित शौनक अभिषेकी (पुणे), पंडित कृष्णेंद्र वाडीकर (हुबळी) याशिवाय आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक मीनाक्षी पराग चौधरी आणि डॉ. पराग चौधरी हे गुरुंना वंदना म्हणून दरवर्षी आपली कला सादर करीत आहेत.

संगीत महोत्सवाच्या तयारीसाठी नुकतीच अकादमीच्या विद्यार्थी मंडळाची बैठक झाली. यावेळी मीनाक्षी पराग चौधरी, डॉ. पराग चौधरी, डी. आर. कुलकर्णी यांनी बैठकीत मार्गदर्शन केले.

यावेळी प्रकाश मुधळवाडकर, योगेश हरबक, गणेश कोटिये, शंकर विधाते, तुषार तोत्रे, हर्षल वानखेडे, सागर गडप्पा, गजानन सोनवणे, भागवत काळे, ऋषिकेश भालेराव, गणेश बडक, दीपक राऊत, कृष्णा गवारे आदींची उपस्थिती होती.






# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
Associate Sponsor riSO Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon



## बहुमान उंचाविणारा उपक्रम

शहराचा बहुमान उंचाविणारा उपक्रम आणि मोहीम राबविण्यात 'लोकमत' समूह नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. महामॅरेथॉन हा त्याचाच एक भाग आहे. शहरामधून धावताना शहराविषयीचे प्रेम अधिक दृढ आणि शहरवासीयांमध्ये बंधुभाव वाढविण्यास हातभार लागेल. म्हणून या स्पर्धेत मी सहभागी होतोय.

- **विजय चाटोरीकर,** संचालक, भाग्यविजय अॅस्ट्रो वास्तू सोल्युशन



## केवळ दोन दिवस बाकी

आतापर्यंत मी सहा मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण केलेल्या असून, यंदा लोकमत महामॅरेथॉनमध्ये आमच्या संस्थेच्या सहकाऱ्यांसोबत धावणार आहे. धावल्याने शारीरिक क्षमता वाढून लक्ष केंद्रित करण्याची शक्तीदेखील वृद्धिंगत होते. त्यामुळे आपले ध्येय गाठण्यास मदत मिळते. आता केवळ दोन दिवस बाकी.

- **सुनंदा बंग,** आयटी प्रमुख, धूत ट्रान्समिशन



## धावण्यासाठी तयार राहा

लोकमत महामॅरेथॉनसारख्या भव्य स्पर्धेचा उत्साह काही वेगळाच असतो. गेल्या वर्षीपेक्षा यंदा अधिक धमाकेदार स्पर्धा होणार यात काही शंका नाही. हजारोंच्या संख्येने लोक एकत्र येऊन धावणार असल्यामुळे रविवारी शहरात चैतन्य आणि नवऊर्जेचे वातावरण तयार होणार आहे. तर मग धावण्यासाठी तयार राहा.

- **अभिषेक शेळके,** संचालक, अभिषेक अॅडव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग प्रा. लि.



## कौतुकास्पद उपक्रम

आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येक जण तणावाखाली वावरत असतो. त्यामुळे स्वत:च्या आरोग्याकडेही लक्ष देण्यासाठी वेळ नाही. लोकमत महामॅरेथॉन स्पर्धेच्या निमित्त लोकांना व्यायाम आणि आरोग्याविषयी जागृत राहण्याची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा आहे. म्हणून हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

- **राजेश बाहेती,** उपाध्यक्ष (खरेदी), धूत ट्रान्समिशन



लोकमत महामॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेला धूत ट्रान्समिशन कंपनीचा संघ.

**लोकमत महामॅरेथॉन :** धावणार नसतील त्यांनीही आपला सहभाग नोंदवावा; आकर्षक बक्षिसे

# तुम्हीही होऊ शकता सहभागी...

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : संपूर्ण** औरंगाबाद शहराला ज्या स्पर्धेचे वेध लागलेले आहेत ती 'लोकमत महामॅरेथॉन' स्पर्धा अवघ्या दोन दिवसांवर आली आहे. रविवारी (दि.१७) सकाळी सहा वाजता सुरु होणाऱ्या या स्पर्धेसाठी हजारो धावपटूंनी गेल्या महिनाभरापासून तयारी सुरु केलेली आहे. प्रत्यक्ष मॅरेथॉनमध्ये धावून स्वत:ला सिद्ध करण्यासाठी हे धावपटू सज्ज झाले आहेत.

मात्र, लोकमतच्या पुढाकाराने सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत महामॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी न होऊ शक लेल्या शहरवासीयांनी नाराज होण्याचे कारण नाही. कारण, तुम्हीदेखील या स्पर्धेत तेवढ्याच हिरीरीने सहभागी होऊ शकता. कारण ही स्पर्धा औरंगाबादच्या प्रत्येक नागरिकाची आहे.

मॅरेथॉनमध्ये धावण्याबरोबरच या धावपटूंचा उत्साह वाढविणे हेसुद्धा मॅरेथॉनचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे आणि तो संपूर्ण शहराला पूर्ण करायचा आहे. या स्पर्धेत आपलाही सक्रिय सहभाग असणे फार आवश्यक आहे. तो कसा घ्यायचा यासाठी काही 'आयडिया' येथे देत आहोत.

जे तरुण काही कारणास्तव मॅरेथॉनमध्ये धावणार नसतील त्यांनी घरी शांत बसू नये. युवक-युवती चेहऱ्यावर रंग लावून, फेटे बांधून, आकर्षक पेहराव करून मार्गावर येऊ शकतात. तारुण्याचा सळसळता जोम धावण्याबरोबरच प्रोत्साहन देण्यातही दिसावा.

गेल्या वर्षीच्या मॅरेथॉन स्पर्धेला शहरवासीयांना जसा भरभरून प्रतिसाद दिला तो कौतुकास्पद होता. पहिल्याच वर्षी औरंगाबादकरांचे मनापासून प्रेम मिळाल्याने पहिली लोकमत मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी ठरली.

तर मग औरंगाबादकरांनो रविवारी सकाळी आळस न करता घराबाहेर येऊन मॅरेथॉन रनर्सना मनापासून 'चिअर अप' करा. कारण 'मी धावतोय शहरासाठी, शहर धावतेय माझ्यासाठी' हे विधान आपल्याला खरे करून दाखवायचे आहे.




## रांगोळी स्पर्धा : प्रथम बक्षीस ५ हजार रुपये




◆ रांगोळीचे आपल्या संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून मॅरेथॉनपटूंच्या स्वागतासाठी आपणही मॅरेथॉन मार्गाच्या कडेला आकर्षक रांगोळी काढून सजावट करून शकता. रांगोळीतून आरोग्य आणि सामाजिक संदेश दिला तर अधिकच उत्तम. रविवारी सकाळी मॅरेथॉन मार्गापाशी काढलेल्या तीन सर्वोत्तम रांगोळींना अनुक्रमे ५ हजार, ३ हजार आणि २ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. विजेत्यांची नावे 'लोकमत'च्या अंकात प्रसिद्ध केली जातील.

## पोस्टर स्पर्धा : प्रथम बक्षीस ३ हजार रुपये




◆ शालेय विद्यार्थ्यांनाही आकर्षक बक्षीस जिंकण्याची संधी आहे. 'ए-३' आकाराच्या कागदावर शाळकरी मुलांनी विविध सामाजिक संदेश देणारे पोस्टर्स तयार करून ते मॅरेथॉन मार्गावर दर्शनीय भागावर लावावेत. 'लोकमत' टीमतर्फे त्यांची पाहणी करून तीन सर्वोत्तम पोस्टर्सची निवड केली जाईल. विजेत्यांना अनुक्रमे ३ हजार, २ हजार आणि १ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येईल.

## औरंगाबादकरांनो, वाढवा धावपटूंचा उत्साह

**१** जे शहरवासी धावणार नसतील ते आपल्या घराबाहेर येऊन मॅरेथॉन मार्गावर उभे राहून धावणाऱ्यांचा उत्साह वाढवू शकतात. तुमच्या प्रोत्साहनाचे शब्द धावपटूंचा उत्साह आणि ऊर्जा द्विगुणित करतील. त्यांना छोट्या-छोट्या पेपर ग्लासमध्ये सॉफ्ट ड्रिंक, ज्यूस, लिंबू सरबत असे पेयसुद्धा आपण देऊ शकता.





**२** मॅरेथॉन मार्गावर ढोल-ताशा, गाणे-संगीत वाजवून, लेझीम खेळून जल्लोषपूर्ण वातावरण तयार करू शकता. सकाळच्या गुलाबी थंडीत धमाल मस्तीवाला 'माहौल' असेल तर मॅरेथॉनपटूंचेही पाय तेजीने धावू लागतील. तसेच यानिमित्त बाहेरून येणाऱ्या धावपटूंना औरंगाबादकरांचे आदरातिथ्य अनुभवण्याची संधी मिळेल.

**३** विशेषत: शाळकरी मुलांनी व्यायाम आणि आरोग्याची प्रेरणा घेण्यासाठी सकाळी लवकर उठून मॅरेथॉन मार्गावर हजर राहून मोठ्या उत्साहात धावपटूंचे मनोबल वाढवावे. तुमच्यासोबत आपल्या कुटुंबाला आणि मित्र परिवारालाही सोबत आणा. पालकांनीदेखील आवर्जून मुलांना घेऊन यावे.



# संशोधनासाठी 'पीएच.डी.' मार्गदर्शकांचा लोचा कायम

**विद्यापीठ :** गाईडशिप कोणाची ठेवायची; कोणाला द्यायची?

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : डॉ.** बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने पात्र विद्यार्थ्यांकडून संशोधनासाठी प्रस्ताव मागवलेले असताना 'पीएच. डी.' मार्गदर्शकांचा लोचा कायम आहे. नवीन गाईडसाठी मागवलेले प्रस्ताव अनेक दिवसांपासून धूळ खात पडून असून, कोणाला गाईडशिप द्यायची याचा काथ्याकुट सुरुच असल्याची माहिती समोर आली आहे.

विद्यापीठाच्या संशोधनासंदर्भात मागील दोन वर्षांपासून प्रचंड गोंधळ सुरू आहे. मागील वर्षी जुलैमध्ये पेट-४ साठी अर्ज मागवले होते. यास दीड वर्ष होत आले असताना संशोधनासंबंधी प्रस्ताव मागवण्यास सुरुवात केली आहे. हे प्रस्ताव ऑनलाइन दाखल करण्याची मुदत १८ डिसेंबरपर्यंत आहे. मात्र संशोधन करण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मार्गदर्शक कोण मिळणार? याचीच सर्वांना धास्ती असल्याचे दिसून आले. विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१६ मध्ये पीएच.डी.संदर्भात नवीन नियमावली लागू केलेली आहे. या नियमानुसार सहायक, सहयोगी आणि प्राध्यापक, अशा तीन श्रेणीतील प्राध्यापकांना संशोधनासाठी ४, ६ आणि ८ एवढेच विद्यार्थी घेण्याचे बंधन आहे. पूर्वी सरसकट गाईड ८ विद्यार्थ्यांना पीएच. डी. चे मार्गदर्शन करीत होते. याशिवाय यूजीसीच्या नियमानुसार ज्या महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा संशोधन केंद्र नाही, अशा महाविद्यालयातील प्राध्यापकांना गाईड म्हणून मार्गदर्शन करता येणार नाही, असा नियम केला आहे. या नियमाची अंमलबजावणी केल्यास बहुतांश महाविद्यालयातील प्राध्यापकांची गाईडशिप रद्द होणार आहे. याविषयीचे धोरण ठरविण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने चार सदस्यीय समिती स्थापन केली असल्याची माहिती विशेष कार्य अधिकारी डॉ. वाल्मीक सरवदे यांनी दिली. यूजीसीच्या नियमांची अंमलबजावणी केल्यास शेकडो प्राध्यापकांची गाईडशिप रद्द होईल. तेव्हा त्यांच्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांचे काय करावे? हा प्रश्न उपस्थित होणार असल्यामुळे सर्व बाबींचा विचार करूनच निर्णय घेण्यात येईल, असेही डॉ. सरवदे म्हणाले. याशिवाय ज्या प्राध्यापकांकडे गाईड होण्याची पात्रता आहे, त्यांना लवकरात लवकर गाईडशिप बहाल करण्यात येईल. यासाठी 'आरआरसी'च्या तात्क ाळ बैठकाही घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### २०१४ च्या पेट उत्तीर्णांचा तीन वर्षांनी विचार



विद्यापीठाने २०१४ मध्ये घेतलेल्या पेट परीक्षेनंतर गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना गाईड मिळाले नव्हते. या विद्यार्थ्यांना आता गाईड देण्यासाठी मागील काही दिवसांपासून 'आरआरसी'च्या बैठका घेण्यात येत आहेत. यानंतर उरलेल्या जागातून २०१७ मधील पेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पीएच.डी.चे गाईड उपलब्ध होणार आहेत.

# जुन्या पेन्शनसाठी अधिवेशनावर मुंडण मोर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : महाराष्ट्र** सरकारने १ नोव्हेंबर २००५ पासून शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना बंद करून अन्यायकारक नवीन अंशदायी पेन्शन योजना (डीसीपीएस) सुरु केली. नवीन लागू करण्यात आलेली पेन्शन योजना बंद करून १९८२ ची जुनीच पेन्शन लागू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेने नागपूर येथील विधिमंडळाच्या अधिवेशनावर महाआक्रोश मुंडण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने नवीन अंशदायी पेन्शन योजना (डीसीपीएस) मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी लाभदायक नसल्यामुळे जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. महाराष्ट्रात १ नोव्हेंबर २००५ नंतर मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन तसेच अन्य कोणताही लाभ मिळालेला नाही. राज्यातील आमदार व मंत्र्यांनी स्वत:साठी जुनी पेन्शन योजनेचे विधेयक मंजूर करून घेतले आहे. शासनाच्या या दुटप्पीपणाचा जाब आक्रोश मोर्चाद्वारे विचारला जाणार आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही जुन्या कुटुंब निवृत्तीवेतन योजनेचा लाभ तात्काळ देण्यात यावा, २००५ नंतर नियुक्त होणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्यावर वेतन, वेतनवाढ व सेवाविषयक अन्याय करणारे शासन निर्णय रद्द करावेत, या व इतर विविध मागण्यांसंबंधी महाआक्रोश मुंडण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

मोर्चात जिल्ह्यातील हजारो शिक्षक- कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष सचिन एखंडे, सरचिटणीस जगन ढोके, योगेश खरात, राजेंद्र गोर्डे, चंद्रकांत जाधव, दीपक नरवडे, अनिल दाणे, धनंजय परदेशी, योगेश फुसे, प्रकाश पुठ्ठेवाड, अमोल बेळगे आदींनी केले आहे.





बीब कलेक्शन एक्स्पो

शनिवार, १६ डिसेंबर २०१७ । वेळ : स. १० ते सायं. ६ वाजेपर्यंत
स्थळ : लोकमत हॉल, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद
सूचना : प्रवेश मागील गेटने

औरंगाबाद महामॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी सर्व स्पर्धकांसाठी हे बीब एक्स्पो आयोजित केले आहे . यामध्ये तुम्हाला मॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी बीब (चेस्ट नंबर ), गुडी बॅग व टी-शर्ट दिले जातील.

कार्यक्रमाची रुपरेषा

| | |
|---|---|
| सकाळी 10.00 वा. | एक्स्पो धावकांसाठी खुले |
| सकाळी 11.00 वा. | उद्‌घाटन |
| सकाळी 11.45 वा. | न्युट्रीशनवर चर्चा |
| दुपारी 12.15 वा. | NOB रॉक बॅण्ड चे सादरीकरण |
| दुपारी 12.30 वा. | गेम शो |
| दुपारी 4.00 वा. | मॅरेथान मार्गाविषयी चर्चा |
| सायं. 5.00 वा. | तुमच्या पेसर बद्दल जाणून घ्या |
| सायं. 5.15 वा. | प्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट आणि फिजिशियन यांच्याशी संवाद |
| सायं. 6.00 वा. | NOB रॉक बॅण्ड चे सादरीकरण |
| सायं. 7.00 वा. | एक्स्पोचा समारोप |

तुमची रेसर कीट घेण्यासाठी :
तुमचा नोंदणी ईमेल / एसएमएस / पावती आणि फोटो ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक. तुमच्या ऐवजी प्रतिनिधी येऊ शकतात, सोबत तुमची स्वाक्षरी केलेले अधिकृत पत्र, ओळखपत्र प्रत व नोंदणी ईमेलची प्रत असणे आवश्यक.
अधिक माहितीसाठी संपर्क : 0240-3021708

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
Associate Sponsor riSO Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION


# पशू-पक्ष्यांसाठी घातक मांजा विक्री एटीसीची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : नावेल्टी** स्टेशनरी व पतंग मांजा विक्रीच्या दुकानावर एटीसीच्या पथकाने कारवाई केली असून, एक जणाला ताब्यात घेतले आहे.

पशू-पक्षी व मानवाच्या जीवितास शारीरिक हानी होऊ नये, त्यांना इजा होऊ नये म्हणून दक्षता घेत तसेच चायनीज मांजा बाळगणे व विक्री करणे प्रतिबंध कारवाई करण्यात आली.

पोलीस स्टेशन बेगमपुरा हद्दीतील सय्यद नुरुल जाहेद सय्यद नुरुल शाहेद (१९, रा. अन्सार कॉलनी, मिटमिटा), जयसिंगपुरा येथे दुकानात चायनीज मांजा बाळगून विक्री करताना आढळून आला. त्याने आदेशाचे उल्लंघन केले म्हणून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महागामीमध्ये 'वयम' नृत्य महोत्सव

**औरंगाबाद : 'महागामी** गुरुकुल'च्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त २३ ते २४ डिसेंबरदरम्यान 'वयम' या नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महागामी केंद्रामध्ये सायंकाळी ७ वाजता हा कार्यक्रम पार पडणार आहे. महागामीच्या संचालिका गुरु पार्वती दत्ता यांचा शिष्य परिवार या महोत्सवात ओडिसी व कथ्थक नृत्य सादर करणार आहे.


आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.



आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521